# राष्ट्रीय सेवा योजना

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व

## तुळजाराम चतुरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, बारामती

## विशेष श्रमसंस्कार शिबीर अहवाल २०२१–२२

डॉ. विलास कर्डिले
डॉ. चंद्रकांत कांबळे
डॉ. वैभव लांडगे

शिबीराचे ठिकाण : मौजे अंजनगाव                कालावधी : १६ ते २२/०१/२०२२

राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व राष्ट्रीय सेवा योजना तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांचे संयुक्त विद्यमाने विशेष श्रमसंस्कार शिबीर रविवार दि. १६ जानेवारी ते शनिवार दि. २२ जानेवारी २०२२ या कालावधीमध्ये दत्तक गाव मौजे अंजनगाव, ता.बारामती जि.पुणे येथे संपन्न झाले.

**उद्घाटन :**

शिबीराचे उद्घाटन सोमवार दि. १६ जानेवारी २०२२ रोजी सकाळी ११.३०वा. मा.डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, सरपंच सौ. सविता बाळासाहेब परकाळे, तर विशेष उपस्थितीमध्ये श्री. मोहनदास बाबर ,मुख्याधापक सोमेश्वर विद्यालय ,अनुजंगाव, ग्रामसेवक सौ. मिनाज कासीम मुलानी उपसरपंच श्री. सुभाष बाबासाहेब वायसे व ग्रामस्थांनी उपस्थित कार्यक्रम अधिकारी, ग्रामस्थ शिबीरार्थी यांच्या उपस्थितित संपन्न झाला.

‘ माझी वसुंधरा , माझा गाव कोरोना मुक्त गांव’ ही संकल्पना समोर ठेवून शिबीर काळात गाव परिसराची स्वच्छता, रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, अनावश्यक काटेरी झाडे, समाजमंदिर, परिसर ग्रामस्वच्छता, वृक्षांना आळी करण व वृक्ष लागवड, कोविड निर्मूलन लसीकरण अभियान, माझी वसुंधरा, माझा गाव कोरोना मुक्त गांव जनजागृती रॅली, इ. उपक्रम राबविण्यात आले.

१) शिबीरातील श्रमदान :

अ) वृक्षांना आळी करणे व वृक्ष लागवड :

वृक्षांचे संवर्धन करण्यासाठी व पर्यावरण रक्षणासाठी गावपरिसर तसेच सोमेश्वर विद्यालय, अनजंगाव शाळेसमोरील परिसरातील वृक्षांना आळी करण्यात आली. तसेच नव्याने शिबीराच्या माध्यमाधून गावठाणपरिसर येथे मोहगनी (भारतीय जातींची ) ६६० वृक्ष लागवड करण्यात आली.

ब ) ग्राम परिसराची स्वच्छता :

'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या उपक्रमासाठी गावातील मंदिर, स्मशानभूमी स्वच्छता, ग्रामदैवत मंदिर परिसर स्वच्छता, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी परिसर प्लॅस्टिक तसेच काटेरी झुडपे, गवत इत्यादी नष्ट करून शिबीरार्थी विद्यार्थ्यांनी 'स्वच्छ भारत अभियान' अंतर्गत गावाचे चित्र बदलून टाकले. तसेच स्मशानभूमी परिसरातील स्वच्छता, मंदीर परिसरातील व रस्त्याच्या कडेचे दगड, गवत, सपाटीकरण, अनावश्यक काटेरी झाडे तोडणे इ. प्रकारची कामे शिबीरादरम्याने स्वयंसेवकांनी केली.

२) संस्कार

अ) व्याख्यानाचे आयोजन :

शिबीर काळात विविध मान्यवरांनी शिबीरार्थींना मौलिक मार्गदर्शन केले यात प्रामुख्याने डॉ. मनोज खोमणे (पं . सं. मुख्य आरोग्य अधिकारी ), प्रा .महेश फुले , सौ. भक्ती देवकाते (नायब तहसीलदार, बारामती), प्रा विजय शिंदे , प्रा. संजय काळे, प्रा उपेंद्र चौधरी,यांचा समावेश होता. तसेच महाविद्यालयाचे, उपप्राचार्य डॉ. अविनाश जगताप, डॉ. अजित तेळवे, डॉ. जगदीश देशपांडे , डॉ. रामचंद्र सपकाळ , डॉ. सिमा गोसावी, डॉ. योगिनी मुळे, रजिस्ट्रार श्री. अभिनंदन शहा यांनी शिबीरस्थळी विशेष भेट देवून मोलाचे मार्गदर्शन केले.

**ब) योगा प्रशिक्षण :**

शिबीर काळामध्ये शिबीरार्थी विद्यार्थ्यांना रोज सकाळी ६ ते ६.३० प्रार्थना व ६.३० ते ७.३० योगसाधनेसाठी आपला वेळ दिला. शिबीरामध्ये योगसाधनेचे प्रशिक्षण प्रा. डॉ. रामचंद्र जगताप यांच्या मार्फत देण्यात आले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून शिबीरार्थींना जीवनात व्यायामाबरोबर योगसाधनेचे व विपशनेचे महत्व समजले.

**क) जनजागृती करणे :**

जनजागृती करण्यासाठी गावामध्ये रॅलीचे आयोजन करण्यात आले. यामध्ये बेटी बचाव, वृक्षलागवड व संवर्धन ग्रामस्वच्छता माझी वसुंधरा , माझा गाव कोरोना मुक्त गांव आरोग्य व विशेष महत्वपूर्ण शौचालय वापर विषयाबाबत जनजागृती केली.

**३) आरोग्य**

**अ) संपूर्ण आरोग्य चिकित्सा शिबीर :**

बारामती येथील निरामय फाऊंडेशन यांच्या मार्फत डॉ. देशपांडे यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे अनजंगाव येथील ग्रामस्थ यांना संपूर्ण आरोग्याची तपासणी व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती. सदर शिबीराचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती यांच्या हस्ते करण्यात आले. समारोप समारंभात शिबीरार्थी तसेच ग्रामस्थांच्या वतीने डॉ. वैभव लांडगे यांनी आभार मानले.

**ब) दंत चिकित्सा शिबीर :**

बारामती येथील दंतचिकित्सक डॉ.राजेंद्र दोशी–ढाकाळकर यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थी, मौजे अनजंगाव येथील ग्रामस्थ यांना दातांची निगा व त्या संबंधीचे मार्गदर्शन करण्यात आले या उपक्रमासाठी ग्रामस्थांची उपस्थिती विशेष उल्लेखनीय होती.

४) अभिनव उपक्रम :

**माझा गाव कोरोना मुक्त गांव** माझा गाव कोरोना मुक्त गांव अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी गावातील प्रत्येक घरामध्ये जावून कोविड निर्मूलन लसीकरण अभियान व त्यासंदर्भात माहिती देवून प्रबोधन करण्यात आले. याचा प्रभाव म्हणूनच अनजंगाव हे गाव १०० टक्के कोविड निर्मूलन लसीकरण झाले. डॉ. सुरज माने व डॉ. शीतल बोबडे यांनी कोविड निर्मूलन लसीकारक अभियान राबिविण्यात व पंचायत समिती मार्फत लस पुरवठा करून शिबिरार्थी तसेच ग्रामस्थांची कोविड चाचणी अभियान यशस्वी करण्यात मोलाचे सहकार्य केले

५) **सांस्कृतिक कार्यक्रम** :

जनजागृती आणि प्रबोधनपर सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले. यामध्ये लोकगीते, विनोदी नाटीका, प्रबोधनपर पथनाट्य यासारख्या कार्यक्रमाचे माध्यमातून सामाजिक प्रश्न अंधश्रध्दा व इतर वाईट प्रथा यावर विशेष भर देण्यात आला या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रा.भिमराव तोरणेसर, डॉ. विलास कर्डिले यांनी केले.

६) **समारोप समारंभ** :

शिबीराचा समारोप दि. २२ जानेवारी २०२२ रोजी मा.डॉ.चंद्रशेखर मुरूमकर, प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, सरपंच श्री. बाळासाहेब परकाळे, तर विशेष उपस्थितीमध्ये श्री. मोहनदास बाबर मुख्याधापक सोमेश्वर विद्यालय ,अनजंगाव, ग्रामसेवक सौ. मिनाज कासीम मुलानी उपसरपंच श्री. सुभाष बाबासाहेब वायसे व ग्रामस्थांनी उपस्थित कार्यक्रम अधिकारी, व ग्रामस्थांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढविली. या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या यशस्वीतेसाठी शिबीर प्रमुख प्रा. डॉ. विलास कर्डिले (जिल्हा समन्वयक रा.सो.यो.) कार्यक्रम अधिकारी डॉ. वैभव लांडगे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व समिती सदस्य यांनी विशेष प्रयत्न केले.

**३) शिबीराचे ठळक वैशिष्टये :**

१) **६६०** पेक्षा जास्त नविन भारतीय जातीची वृक्ष लागवड व असणाऱ्या वृक्षांना आळी केली.

२) मंदिर, स्मशानभूमी, शाळेचे मैदान, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आदी परिसर स्वच्छ करण्यात आला.

४) समाज प्रबोधनासाठी रॅली, पथनाटयाचे आयोजन.

५) योग प्रशिक्षण स्वयंसेवकांना दिले.

६) अनेक मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

७) शिबीराच्या माध्यमातून शिबिरार्थीचा सर्वांगीण विकासाच्या दिशेने वाटचालीच पूरक ठरला.

कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
महाविद्यलय,

Tuljaram Chaturchand College Baramati

प्राचार्य
तुळजाराम चतूरचंद कला, विज्ञान आणि वाणिज्य
बारामती

विशेष श्रमसंस्कार शिबीर (16-22/1/2022)
अंजनगांव छायाचित्र




दिनदर्शिका भेट




योगासने करताना

डॉ सोमनाथ हिंगडा स्वयंसेवकांशी




Baramati
College

कोविडलस मोहिम



ग्राम स्वच्छता



Tuljaram Chaturchand College
Baramati




मा. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर सर
स्वयंसेवकांशी हितगुज करताना



ग्राम स्वच्छता

Baramati College






